रविवार दि. ३० ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३५९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### भाग्य नगर उड्डाणपुलाखाली मनपाची धडक कारवाई

# १९ अनधिकृत अतिक्रमणे जमीनदोस्त

### आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण हटाव मोहीम; रस्ते व पदपथ झाले मोकळे, वाहतूक सुरळीत होण्यास मदत



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत अतिक्रमणांविरोधात महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा धडक मोहीम हाती घेतली आहे. महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या थेट निर्देशानुसार शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी भाग्य नगर येथील उड्डाणपुलाखाली विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत उड्डाणपुलाखालील तब्बल १९ अनधिकृत अतिक्रमणे पूर्णपणे निष्कासित करण्यात आली.

महानगरपालिकेच्या या कारवाईमुळे भाग्य नगर उड्डाणपुलाखालील परिसरातील रस्ते व पदपथ मोठ्या प्रमाणात मोकळे झाले आहेत. परिणामी पादचाऱ्यांची ये-जा तसेच वाहनांची वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली असून, अतिक्रमणामुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

**सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणांविरोधात मनपाचा आक्रमक पवित्रा**

जालना शहराचा विस्तार आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता प्रमुख रस्ते, चौक, पदपथ तसेच उड्डाणपुलाखालील जागांवर होणाऱ्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीच्या समस्येत भर पडत आहे. काही ठिकाणी अनधिकृत टपऱ्या, हातगाड्या तसेच इतर स्वरूपातील अतिक्रमणांमुळे नागरिकांना रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे येत आहेत.

या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहिमेला वेग दिला आहे. भाग्य नगर येथील उड्डाणपुलाखाली शनिवारी करण्यात आलेली कारवाई त्याच मोहिमेचा एक भाग आहे. प्रशासनाने अतिक्रमणधारकांना कोणतीही सवलत न देता सार्वजनिक जागा मोकळ्या करण्यावर भर दिला.

**पुन्हा अतिक्रमण केल्यास कठोर कारवाईचा इशारा**

दरम्यान, ज्या ठिकाणी अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत, त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण केल्यास संबंधितांवर महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यातील तरतुदीनुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे. केवळ अतिक्रमण हटवून थांबणार नसून, पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांवर दंडात्मक तसेच फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. तसेच अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसाठी महानगरपालिका प्रशासनाला जो खर्च येईल, तो संबंधित अतिक्रमणधारकांकडून वसूल करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अतिक्रमण हटविल्यानंतर त्याच जागेवर पुन्हा टपऱ्या, हातगाड्या किंवा अन्य स्वरूपाचे बांधकाम करून सार्वजनिक जागा व्यापणाऱ्यांवर आता कारवाईची टांगती तलवार राहणार आहे.

**टपऱ्या, हातगाड्यांमुळे वाहतुकीला अडथळा नको**

महानगरपालिका प्रशासनाने शहरातील नागरिक आणि व्यावसायिकांना सार्वजनिक रस्ते, पदपथ तसेच शासकीय जागेवर अनधिकृतपणे अतिक्रमण न करण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः अनधिकृत टपऱ्या अथवा हातगाड्या लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शहरातील प्रमुख मार्ग, चौक आणि सार्वजनिक ठिकाणांवरील अतिक्रमणे नागरिकांच्या दैनंदिन हालचालींना अडथळा ठरत असल्याने यापुढेही अशाच प्रकारे कडक कारवाई केली जाणार असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

**आयुक्तांच्या निर्देशानुसार कारवाईला वेग**

जालना महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या थेट निर्देशानुसार अतिक्रमण विभागामार्फत शहरातील विविध भागांत कारवाई केली जात आहे. सार्वजनिक जागा नागरिकांसाठी खुल्या ठेवणे, वाहतुकीतील अडथळे दूर करणे आणि पदपथ पादचाऱ्यांसाठी मोकळे करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

भाग्य नगर उड्डाणपुलाखाली झालेल्या कारवाईनंतर परिसरातील नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असून, शहरातील इतर प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणांवरही *(पान २ वर)*

## महिला मोर्चाची ताकद वाढवा, प्रत्येक घरापर्यंत भाजपाचा विचार पोहोचवा - भास्कर दानवे

### जालना शहराची भाजपा महिला मोर्चाची संघटनात्मक बैठक संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जालना महानगरातील संघटनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे व जालना महानगर प्रभारी सौ. कल्पनाताई डांगे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष शुभांगीताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांनी महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटनात्मक मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे आदींची उपस्थिती होती.



बैठकीदरम्यान जालना महानगरातील विविध मंडळांच्या महिला मोर्चा मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये नवीन जालना मंडळाच्या अध्यक्षपदी श्रीमती स्नेहा राजेश जोशी, जुना जालना मंडळाच्या अध्यक्षपदी सौ. दिपाली दिलीप बिनीवाले, पूर्व जालना मंडळाच्या अध्यक्षपदी सौ. रश्मी शशिकुमार टेकवाणी तसेच महानगर ग्रामीण मंडळाच्या अध्यक्षपदी सौ. सुषमा गजानन खरात यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी महिला मोर्चाची संघटनात्मक ताकद अधिक बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले. महिला मोर्चाची भूमिका पक्षाच्या संघटनात्मक कार्यात अत्यंत महत्त्वाची असून, प्रत्येक मंडळात *(पान २ वर)*

## ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित प्रश्नांसाठी दीपक रणनवरे यांचे उपोषण सुरू

**जालना - प्रतिनिधी**

ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित प्रश्नांसाठी सामाजिक कार्यकर्ते दीपक रणनवरे यांनी आसपासून जालना शहरातील गांधी चमनवर अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे.

महापुरुषांना वंदन करून दीपक रणनवरे यांनी आपले उपोषण सुरू केले आहे. उपोषण प्रारंभ समयी समस्त ब्राह्मण समाज राज्य समन्वयक योगेश जांतीकर,



छायाचित्र- मधुसूदन दंडारे

भूषण जोशी, प्रा.एस. पी. देशपांडे, अॅड. बळवंत नाईक, एस.एन.कुलकर्णी, अनिल लोखंडे, आर आर जोशी, डॉ. वसंत चौकुले, संतोष दाणी ,प्रसाद पाटील, संजय देशपांडे,अरविंद देशपांडे, विलासराव कुलकर्णी,आदींची उपस्थिती होती. *(पान २ वर)*

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त नागसेन ग्रंथालयात काव्यप्रतिभांचा बहारदार मेळावा

**जालना - प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आणि साहित्याचा जागर जिवंत ठेवत साहित्य, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीचा सुरेख संगम घडविणाऱ्या नागसेन ग्रंथालय, जालना व मुद्रा साहित्य सेवा संस्था, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता नागसेन ग्रंथालय येथे भव्य कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नामवंत कवी आणि साहित्यिकांच्या उपस्थितीमुळे हा साहित्यसोहळा रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

या कवीसंमेलनाचे उद्घाटन महापौर वंदना मगरे यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक सुरेश साबळे हे अतिथी कवी म्हणून उपस्थित राहणार असून, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रभाकर शेळके अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. कार्यक्रमाला ज्येष्ठ समाजसेवक रमेश देहेडकर, प्राचार्य राजकुमार म्हस्के आणि मार्गदर्शक सुधाकर वाहुळे यांची प्रमुख *(पान २ वर)*

## चौधरी नगर येथे तीज महोत्सव उत्साहात साजरा

### *आमदार अर्जुनराव खोतकर व सौ. सीमाताई खोतकर यांची उपस्थिती*

### *बंजारा समाज भगिनींसोबत सौ. सीमाताई खोतकर यांनी धरला पारंपरिक नृत्याचा ठेका*

**जालना - प्रतिनिधी**

चौधरीनगर महाराष्ट्रातील तीज महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर आणि सौ. सीमाताई अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित राहून महिला भगिनींना तीज महोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. पारंपरिक वेशभूषा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि




उत्साहपूर्ण वातावरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. तीज महोत्सवानिमित्त बंजारा समाजातील महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह पारंपरिक नृत्य सादर केले. यावेळी सौ. सीमाताई अर्जुनराव खोतकर यांनी बंजारा समाजातील भगिनींसोबत उत्स्फूर्तपणे नृत्यात सहभाग घेतला आणि महिलांसोबत आनंदाने ठेका धरला. त्यांच्या या सहभागामुळे उपस्थित महिला भगिनींच्या उत्साहात आणखी भर पडली. सौ. सीमाताई खोतकर यांनी कोणताही औपचारिकपणा न ठेवता महिलांमध्ये मिसळून त्यांच्या आनंदात सहभागी होत पारंपरिक नृत्य केले. यावेळी उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या सहभागाचे स्वागत केले. बंजारा समाजाच्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या *(पान २ वर)*

# संपादकीय...

## तलावाच्या सांडव्यांना भेगा; प्रशासनाला अजूनही ‘धोक्याची’ जाणीव आहे का?

जालना शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या तलावाच्या सांडव्यांच्या भिंतींना भेगा पडल्याची बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तलावाची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी आणि तलावातील गाळ काढून पाणी साठवण क्षमता वाढवावी, अशी मागणी केली आहे. ही मागणी केवळ एखाद्या विकासकामाची मागणी म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा प्रश्न थेट जलसुरक्षेचा आणि संभाव्य आपत्ती टाळण्याचा आहे. सांडव्याच्या भिंतीला पडलेली भेग ही साधी बांधकामाची त्रुटी समजून दुर्लक्ष करण्याचा विषय नाही. पावसाळ्यात पाण्याची आवक वाढली, तलावाची पातळी वाढली आणि संरचनेवर पाण्याचा दाब आला, तर आधीच कमकुवत झालेल्या भागावर त्याचा काय परिणाम होईल, याचा तांत्रिक अंदाज घेणे आवश्यक आहे. दुर्घटना घडण्याची वाट पाहून उपाययोजना करण्यापेक्षा धोका दिसत असतानाच प्रतिबंधात्मक कारवाई करणे, ही प्रशासनाची खरी कसोटी आहे. या प्रश्नाचे उत्तर संबंधित यंत्रणांनी जनतेला द्यायला हवे. तलावाच्या सांडव्यांच्या भिंतींमध्ये भेगा असल्याचे निदर्शनास येत असेल तर सर्वप्रथम त्यांची संरचनात्मक सुरक्षितता तपासणे आवश्यक आहे. भेगा किती जुन्या आहेत? त्यांची रुंदी किती आहे? त्या फक्त पृष्ठभागावर आहेत की संरचनेच्या आतपर्यंत पोहोचल्या आहेत? पाण्याच्या दाबामुळे त्यांची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे का? सांडव्याची एकूण वहनक्षमता सुरक्षित आहे का? या प्रश्नांची उत्तरे केवळ अंदाजाने देता येणार नाहीत. तज्ज्ञ अभियंते, जलसंपदा क्षेत्रातील अधिकारी आणि संरचनात्मक तज्ज्ञ यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अहवाल तयार करणे गरजेचे आहे. अहवालात धोका आढळल्यास तातडीची दुरुस्ती आणि आवश्यक असल्यास आपत्कालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. जालना शहराला पाणी हवे आहे. पण पाणीपुरवठ्यासाठी ज्या जलस्रोतावर अवलंबून राहायचे, तोच जलस्रोत असुरक्षित असेल तर शहराच्या पाणी नियोजनाचा पाया कमकुवत राहतो. पाणीटंचाईच्या काळात तलावातील प्रत्येक थेंब महत्त्वाचा असतो. त्यामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता वाढविण्याची मागणीही महत्त्वाची आहे. मात्र येथे एक विरोधाभास आहे. तलावात अधिक पाणी साठवायचे असेल, तर तलावाची संरचना त्यासाठी पूर्णपणे सुरक्षित आहे का, हे आधी निश्चित करावे लागेल. सांडव्यांच्या भिंतींना भेगा असताना त्यांची तांत्रिक तपासणी न करता अधिक पाणी साठवण्याचा आग्रह धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे सुरक्षितता आणि पाणी साठवण क्षमता यांचा विचार एकाच जलव्यवस्थापन आराखड्यातून करणे आवश्यक आहे. तलावात गाळ साचल्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी होत असेल तर हा आज निर्माण झालेला प्रश्न नाही. हा वर्षानुवर्षांच्या देखभालीशी संबंधित प्रश्न आहे. तलावात गाळ साचतो, जलसाठ्याची खोली कमी होते, पाण्याची क्षमता घटते आणि उपलब्ध जलस्रोताचा अपेक्षित उपयोग करता येत नाही. त्यानंतर पाणीटंचाई निर्माण झाली की अतिरिक्त पाण्याची मागणी वाढते. म्हणजेच एकीकडे पाण्याची गरज वाढत आहे आणि दुसरीकडे उपलब्ध जलस्रोताची क्षमता गाळामुळे कमी होत आहे. हा विरोधाभास दूर करण्यासाठी तलावाचे नियमित सर्वेक्षण, गाळाचे प्रमाण मोजणे आणि नियोजनबद्ध गाळ काढणे आवश्यक आहे. गाळ काढणे म्हणजे फक्त माती उपसणे नव्हे तलावातील गाळ काढण्याची मागणी केली की अनेकदा ती केवळ एक बांधकाम प्रक्रिया म्हणून पाहिली जाते. प्रत्यक्षात त्यामागे जलसंधारणाचे मोठे नियोजन असते. किती गाळ साचला आहे? तलावाची मूळ क्षमता किती होती? सध्याची क्षमता किती आहे? गाळ काढल्यानंतर किती अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध होईल? गाळाची विल्हेवाट किंवा पुनर्वापर कसा करायचा? या सर्व प्रश्नांचा अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे जालना तलावासाठी ‘सर्वेक्षणतांत्रिक आराखडागाळ काढणेदेखभाल’ अशी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. आजची दुरुस्ती उद्याची दुर्घटना टाळू शकते जलसाठ्यांच्या बाबतीत ‘नंतर पाहू’ ही मानसिकता अत्यंत धोकादायक आहे. भिंतीला पडलेली छोटी भेग सुरुवातीला किरकोळ वाटू शकते. पण पाण्याचा सततचा दाब, पावसाचे पाणी, झिरपण, मातीची हालचाल किंवा इतर संरचनात्मक कारणांमुळे तिचे स्वरूप बदलू शकते. त्यामुळे प्रशासनाने ‘भेग आहे की नाही?’ एवढाच प्रश्न विचारण्यापेक्षा ‘भेगेचे कारण काय आणि त्यातून धोका किती?’ हा प्रश्न विचारला पाहिजे. जलसुरक्षेत अंदाजाला स्थान नसते; तांत्रिक तपासणी आणि वैज्ञानिक निष्कर्षांना स्थान असते. जालना शहराच्या पाणीप्रश्नावर अनेकदा स्वतंत्रपणे चर्चा होते. कुठे पाईपलाइन, कुठे टाकी, कुठे गळती, कुठे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रकअशा अनेक प्रश्नांवर उपाययोजना केल्या जातात. परंतु शहराचा दीर्घकालीन पाणीप्रश्न सोडवायचा असेल तर जलस्रोतापासून नळापर्यंतची संपूर्ण साखळी तपासावी लागेल. तलाव सुरक्षित आहे का? त्याची साठवण क्षमता किती आहे? गाळ किती आहे? पाण्याची आवक किती आहे? गळती किती आहे? पाणीपुरवठा यंत्रणेची कार्यक्षमता किती आहे? भविष्यातील शहराच्या लोकसंख्येनुसार पाण्याची गरज किती असेल? या सर्व प्रश्नांची उत्तरे एका व्यापक जलव्यवस्थापन आराखड्यात असली पाहिजेत. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे तलावाच्या सुरक्षिततेसह गाळ काढण्याचा मुद्दा मांडला आहे. त्यामुळे आता हा विषय केवळ मागणीपुरता न राहता शासन आणि स्थानिक प्रशासनाच्या कार्यवाहीचा विषय झाला आहे.

पान १ व ४ वरुन...

### १९ अनधिकृत...

अशीच कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचा मोठा सहभाग**

ही धडक कारवाई सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत पार पडली. यावेळी अतिक्रमण विभाग प्रमुख शोएब खान, स्वच्छता विभाग प्रमुख सुधीर डहाळे यांच्यासह अतिक्रमण विभागातील कर्मचारी आणि महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारवाईत शुभम जाधव, राहुल हिवाळे, मॅथ्यू चॉको, फेरोज बेग, कादर खान, तुषार लोखंडे, सचिन ढवळे, राधेश्याम लोखंडे, विक्रांत कीर, रावसाहेब लोखंडे, आशिष गायकवाड, सचिन जाधव, मंगेश साठे, अरुण वानखेडे आदी स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच मोहम्मद अमजद हयात खान, मोकाट कुत्रे निर्बीजीकरण विभागाचे पथक प्रमुख, यांच्यासह महानगरपालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**शहरातील प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणेही हटविणार**

भाग्य नगर उड्डाणपुलाखालील १९ अतिक्रमणे हटविल्यानंतर आता शहरातील इतर प्रमुख मार्गांवरील अनधिकृत अतिक्रमणांवरही महानगरपालिका प्रशासनाची नजर राहणार आहे. अतिक्रमण हटाव मोहीम यापुढेही सातत्याने आणि प्रभावीपणे सुरू ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विशेषतः वाहतुकीला अडथळा निर्माण करणारी अतिक्रमणे, सार्वजनिक रस्ते व पदपथ व्यापणाऱ्या टपऱ्या आणि हातगाड्यांविरोधात कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे शहरातील अतिक्रमणधारकांमध्ये प्रशासनाच्या या भूमिकेमुळे धाक निर्माण झाला आहे.

कारवाईनंतर जागा पुन्हा व्यापली जाऊ नये, हे आव्हान

दरम्यान, अतिक्रमण हटविल्यानंतर काही दिवसांनी त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होण्याच्या घटना अनेक शहरांमध्ये दिसून येतात. त्यामुळे भाग्य नगर उड्डाणपुलाखाली मोकळ्या करण्यात आलेल्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी महानगरपालिका प्रशासनाला सातत्याने देखरेख ठेवावी लागणार आहे.

प्रशासनाने मात्र पुन्हा अतिक्रमण झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच हटाव मोहिमेचा खर्चही संबंधितांकडून वसूल करण्याची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे आता कारवाईनंतर त्या जागेचे संरक्षण करण्याचे आव्हानही मनपासमोर असणार आहे.

**अतिक्रमण हटाव मोहीम सुरूच राहणार**

जालना शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सुरू केलेली मोहीम यापुढेही सुरूच राहणार आहे. नागरिकांना सुरक्षित आणि मोकळे रस्ते उपलब्ध करून देणे, वाहतुकीतील अडथळे दूर करणे आणि सार्वजनिक जागांचा योग्य वापर सुनिश्चित करणे, या उद्देशाने कारवाईची व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विजय फुलंब्रीकर, सहाय्यक आयुक्त, जालना शहर महानगरपालिका

### महिला मोर्चाची ताकद...

महिला कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन उभे करून पक्षाचा विचार जनतेपर्यंत पोहोचवावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना सौ. कल्पनाताई डांगे म्हणाल्या की, महिला मोर्चाच्या माध्यमातून पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्याने सक्रियपणे काम करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा. तसेच बूथ पातळीपर्यंत महिला संघटन मजबूत करून अधिकाधिक महिलांना पक्षाच्या विचारांशी जोडण्याचे काम करावे.

यावेळी भाजपा महिला मोर्चा जालना महानगर जिल्हाध्यक्षा सौ. शुभांगीताई देशपांडे यांनी नवनियुक्त मंडळ अध्यक्षांचे अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, ‘‘महिला मोर्चाच्या माध्यमातून जालना महानगरातील प्रत्येक मंडळ आणि बूथ पातळीवर संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करायचे आहे. महिलांना संघटनेशी जोडून त्यांना नेतृत्वाची संधी देत पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी महिला मोर्चा प्रभावीपणे कार्य करेल.’’

श्रीमती स्नेहा राजेश जोशी यांनी नियुक्तीबद्दल पक्षाचे आभार मानत, दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून महिला मोर्चाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. सौ. दिपाली दिलीप बिनीवाले यांनी पक्षाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करून, महिलांना मोठ्या संख्येने संघटनेशी जोडून पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले. सौ. रश्मी शशिकुमार टेकवाणी यांनी मिळालेल्या संधीबद्दल पक्षाचे आभार मानले. महिला कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटन मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले तसेच सौ. सुषमा गजानन खरात यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ग्रामीण भागातील महिलांपर्यंत पक्षाचे विचार व शासनाच्या लोककल्याणकारी योजना पोहोचवून महिला संघटन अधिक मजबूत करण्यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### ब्राह्मण समाजाच्या...

यावेळी बोलतांना दीपक रणनवरे म्हणाले की, ब्राह्मण समाजाच्या प्रश्नांकडे लक्ष घालावे, या मागणीसाठी आपण यापूर्वी जालना शहरात दोन वेळा उपोषण केले आहे. ब्राह्मण समाजाच्या व्यथा ऐकण्यासाठी राज्य शासन तयारच नाही. ब्राह्मण समाजातील मुला-मुलींना सर्व शिक्षण मोफत करण्यात यावे, ब्राह्मण समाजातील मुला मुलींसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी केंद्र मंजुर करुन आवश्यक सुविधा शासनाच्या वतीने किंवा महामंडळाच्या वतीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात, ईडब्ल्यूएस ची उत्पन्नाची ८ लाखाची मर्यादा हटवून १५ लाख करण्यात यावी, ब्राह्मण समाजातील विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतीगृह व परशुराम भवन उभारावे, अॅट्रासिटीच्या धर्तीवर ब्राह्मण समाजाच्या सुरक्षिततेसाठी विशेष कायदा करुन सामाजिक विडंबनातून मुक्ता करण्यात यावी, ब्राह्मण समाजातील आर्थीक मागास घटकातील तरुणांना व्यवसायिक मदतीसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळास एक हजार कोटीची तरतुद करण्यात यावी व त्याचा लाभ लवकरात लवकर लाभार्थ्यांना देण्याची जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कार्यप्रणाली स्थापित करण्यात यावी व विविध योजनाला मंजुरी देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने आपण आजपासून बेमुदत अन्नत्याग उपोषणास बसलो आहोत,जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आपले उपोषण सुरू राहणार असल्याचे रणनवरे यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, जगदीश कुलकर्णी, मंदार कुलकर्णी, दिलीप जोशी, सुनील कुलकर्णी, महेश भालेराव, संजय जोशी, गणेश पाटील, अशोक पडुळ,संतोष कन्हाळे, राजेंद्र जाधव, विनोद महाराज कुलकर्णी, सिध्दीविनायक मुळे, अॅड. विपुल देशपांडे, अतुल वझरकर,अनिल दीक्षित, प्रसाद पाटील आदींनी उपोषणस्थळी भेट देऊन दीपक रणनवरे यांच्या उपोषणास पाठिंबा दिला.

### चौधरी नगर...

या सोहळ्यातील हा क्षण उपस्थितांसाठी विशेष आकर्षणाचा ठरला. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित महिला भगिनींशी संवाद साधत तीज महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे तसेच आपल्या समृद्ध संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. महिला भगिनींचा सामाजिक, सांस्कृतिक आणि विविध क्षेत्रांतील सहभाग वाढावा, यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. तीज महोत्सवाच्या माध्यमातून महिलांना एकत्र येत आपला आनंद व्यक्त करण्याची आणि पारंपरिक संस्कृतीचा उत्सव साजरा करण्याची संधी मिळाली. विशेषतः बंजारा समाजातील पारंपरिक नृत्य, वेशभूषा आणि सांस्कृतिक सादरीकरणामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.

सौ. सीमाताई खोतकर यांनीही सर्व महिला भगिनींना तीज महोत्सवाच्या शुभेच्छा देत त्यांच्या आनंदात सहभागी झाल्या. महिलांसोबत केलेल्या उत्स्फूर्त नृत्यामुळे कार्यक्रमात आपुलकीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमास महिला भगिनींसह विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक संस्कृती, महिला एकजूट आणि उत्साहाच्या वातावरणात तीज महोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला.

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना येथे विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या उपोषणाला सर्व प्रथम उपस्थित राहुल उद्योग मंत्री उदय सामंत यांना उपोषण स्थळी नेऊन उपोषणकर्त्यांचे सविस्तर चर्चा घडवली व बंजारा समाज बांधवांच्या एस. टी. आरक्षण संदर्भात विधानसभेत आवाज उठवला या वेळी अॅड. उत्तम राठोड, बाबुराव पवार,अविनाश चव्हाण, नाईक विजय चव्हाण ( बंजारा संघर्ष योद्धा) उद्धव पवार, जिजाबाई राठोड, मीराबाई जाधव, संजय जाधव, रमेश चव्हाण, देविदास चव्हाण, विठ्ठल चव्हाण, मोहन राठोड, अंजेभाऊ राठोड, डी. बी. जाधव, गोरख पवार, एकनाथ चव्हाण, विठ्ठल राठोड, अर्जुन पवार, शिवाजी चव्हाण, सुरेश राठोड, शाम राठोड, गुलाब राठोड यांच्यासह परिसरातील बांधवांची उपस्थिती होती.

### अण्णाभाऊ साठे...

उपस्थिती लाभणार आहे. कवीसंमेलनात सुनील लोणकर, डॉ. सुहास सदावर्ते, विनोद जैतमहाल, डॉ. गणेश कंटूले, रेखा गतखणे, प्रा. अशोक खेडकर, डॉ. राज रणधीर, मनीष पाटील, शिवाजी तेलंगे, संगीता चव्हाण, डॉ. दिगंबर दाते, डॉ. बी. जी. श्रीरामे, गणेश खरात, प्रा. कृष्णा कदम, श्रीमंत ठवळे, विनोद काळे, मनीषा गायकवाड,

जिजा वाघ, दिनेश शेळके, संजयकुमार सरदार, चंद्रकांत बोर्डे, किशोर भालेराव, सर्जेराव खरात, लक्ष्मीकांत दाभाडकर, समाधान खाडे, कांचन थोरवे, दीपक मगरे हे निमंत्रित कवी आपल्या कवितांमधून सामाजिक वास्तव, मानवी संवेदना, निसर्ग, प्रेम आणि समकालीन जीवनाचे विविध पैलू रसिकांसमोर उलगडणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पंढरीनाथ सारके आणि सुहास पोतदार करणार आहेत. नागसेन वाचनालयाचे अध्यक्ष राजेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होत असून संयोजक कैलास भाले हे नियोजनाची धुरा सांभाळत आहेत.

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक आणि सामाजिक वारशाला अभिवादन करणाऱ्या या आगळ्यावेगळ्या काव्यमैफलीस जालना शहरासह जिल्ह्यातील साहित्यप्रेमी, कवी, वाचक आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### विखे पाटलांचा जात...

निर्माण करणारी असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारकडून वेळोवेळी आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्षात समाजाच्या अपेक्षांची पूर्तता झाली नसल्याचा आरोप करत, आता अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे मराठा समाजाची पुन्हा एकदा दिशाभूल व फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

या कथित वक्तव्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी डॉ. लाखेपाटील यांनी केली आहे. तसेच राज्यपालांनीही या प्रकरणाची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली. विखे पाटील यांना केवळ मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदावरून हटविणे पुरेसे नसून, त्यांना मंत्रिमंडळातूनही हटवावे, अशी आग्रही मागणी डॉ. लाखेपाटील यांनी केली आहे. दरम्यान, जात पडताळणी समित्यांच्या अस्तित्वाबाबत करण्यात आलेल्या कथित वक्तव्यामुळे आता राज्य सरकारची अधिकृत भूमिका काय आहे, याकडे लक्ष लागले आहे. जात प्रमाणपत्र पडताळणीची विद्यमान व्यवस्था, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि आरक्षणाच्या लाभार्थ्यांचे हित या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर सरकारने या विषयावर स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणीही मराठा समाजातून होण्याची शक्यता आहे. जात पडताळणीची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्याऐवजी समित्यांचे अस्तित्वच संपविण्याचा विचार योग्य आहे का, हा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित झाला आहे. त्यामुळे आगामी काळात या मुद्द्यावर सरकार, मराठा संघटना आणि इतर सामाजिक घटकांमध्ये चर्चा रंगण्याची शक्यता आहे.

### महिला आर्थिक...

महिला शेतकऱ्यांचा भांडवली खर्च कमी होण्यास मदत होत आहे. पेरणी, आंतरमशागत आणि कापणीसारखी कामे आधुनिक यंत्रांच्या मदतीने वेळेत पूर्ण करता येत असल्याने शेतीची कार्यक्षमता वाढण्यास हातभार लागत आहे.

त्याचबरोबर कृषी अवजारे भाड्याने देण्याच्या माध्यमातून महिला समूहांना नियमित उत्पन्नाचा स्रोत मिळत आहे. अवजार बँकांचे व्यवस्थापन, देखभाल आणि वाहतुकीतून स्थानिक रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत.

**‘‘५४ महिला उत्पादक कंपन्यांकडून कृषी निविष्ठांचा पुरवठा‘‘**

कृषी निविष्ठांच्या क्षेत्रातही ‘उमेद’च्या माध्यमातून महिलांना मोठी संधी मिळत आहे. राज्यातील ५४ महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे बियाणे व खत विक्रीसाठी आवश्यक परवाने उपलब्ध आहेत. या माध्यमातून सुमारे ५४ हजार महिला सभासदांना सेवा दिली जात आहे.

महिला शेतकरी उत्पादक कंपन्या सभासदांची मागणी एकत्रित करून मोठ्या प्रमाणावर बियाणे, खते आणि इतर कृषी निविष्ठांची खरेदी करतात. सामूहिक खरेदीमुळे दर्जेदार निविष्ठा योग्य दरात आणि वेळेत उपलब्ध होण्यास मदत होत आहे.

**‘‘रेशन दुकानापासून वीट निर्मितीपर्यंत महिलांचा व्यवसाय विस्तार‘‘**

‘उमेद’ अभियानाने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला केवळ शेतीपुरते मर्यादित न ठेवता विविध व्यवसायांपर्यंत विस्तार दिला आहे. स्वयं-सहाय्यता समूहांच्या माध्यमातून रेशन दुकाने, सिमेंट एजन्सी, वीट निर्मिती, केरोसीन एजन्सी आणि टाईल्स निर्मिती यांसारखे व्यवसाय महिलांकडून चालविले जात आहेत.

३२ स्वयं-सहाय्यता समूहांमधील ५८ महिला रेशन दुकाने चालवित आहेत. एका स्वयं-सहाय्यता समूहातील २३ महिला सिमेंट विक्रीच्या व्यवसायात कार्यरत आहेत. दोन समूहांमधील २४ महिला वीट निर्मिती व्यवसायात सहभागी आहेत. याशिवाय दोन महिला केरोसीन एजन्सी, तर दोन महिला टाईल्स निर्मितीचा व्यवसाय चालवित आहेत.

**‘‘बचत गटातून उद्योजकतेकडे वाटचाल‘‘**

‘उमेद’च्या माध्यमातून ग्रामीण महिलांचा प्रवास बचत आणि कर्जाच्या पारंपरिक चौकटीपलीकडे जाऊन उद्योजकतेकडे होत आहे. व्यवसाय व्यवस्थापन, वित्तीय समावेशन आणि बाजारपेठेशी जोडणी यासाठी संस्थात्मक पाठबळ मिळत असल्याने महिलांची निर्णयक्षमता आणि आर्थिक स्वावलंबन वाढत आहे.

गावातच रोजगार आणि नियमित उत्पन्नाच्या संधी निर्माण झाल्याने कुटुंबाच्या उत्पन्नाला हातभार लागत आहे. त्याचवेळी गावातील नागरिकांनाही आवश्यक वस्तू व सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होत आहेत.

**‘‘ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा‘‘**

महिला स्वयंसहाय्यता समूहांची सामूहिक ताकद, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि उद्योजकतेला मिळणारे संस्थात्मक पाठबळ यांचा संगम ‘उमेद’ अभियानातून साधला जात आहे. त्यामुळे ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच गावांच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळत आहे.

### रक्षाबंधनातून बंधुभावासोबत...

जतन करत त्यांना सामाजिक आणि पर्यावरणीय उपक्रमांची जोड देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. भावनिक, संस्कारक्षम आणि पर्यावरणपूरक वातावरणात रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

### सत्तेत असलेल्यांना...

हीच जागरूक पिढी भविष्यात लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास श्री .डोके यांनी व्यक्त केला. ‘‘सत्तेत असलेल्यांना प्रश्न विचारण्यासाठी मागे-पुढे न पाहणारी पिढी घडत आहे. ही प्रक्रिया देशातील परिवर्तनाचे आशादायी चित्र निर्माण करणारी आहे,’’ असे दिपक डोके यांनी सांगितले.भारतीय बौद्ध महासभेचे ठाणे जिल्हा संस्कार सचिव बाळासाहेब आचळे यांनी नियमित भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन केले कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी प्रतापराव मोरे ,उत्तमराव मोरे ,बाबुराव आचळे ,किसन खाडे ,अमोल मोरे ,भीमराव मोरे ,भगवानराव मोरे,कुंडलिकराव उघडे,भगवान खरात, विलास मोरे, राजू शेजुळ,लहू मोरे,राहुल मोरे, मुकेश मोरे, नितीन शिंदे, उमेश उघडे, सिध्दार्थ मगर,भास्कर आचळे यांनी परीश्रम घेतले.

### राष्ट्रवादी काँग्रेस...

कार्यकर्त्यांमध्ये उत्साहा पाहायला मिळत आहे.म्हणून माझ्या मते मी नामदार लोणीकर साहेबांना लोकनेते म्हणून संबोधित करण्यास हरकत नाही.या कार्यक्रमाला राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची पण उपस्थिती होती.

### रिक्षा-टॅक्सी...

अडकवणे पूर्णपणे चुकीचे आहे. एका राज्यातील नागरिक पोटापाण्यासाठी दुसऱ्या राज्यात जाऊन प्रामाणिकपणे काम करत असतात; अशा प्रादेशिक व भाषिक वादविवादांमुळे या कष्टकरी लोकांचे प्रचंड हाल होतात आणि त्यांना विनाकारण त्रासाला सामोरे जावे लागते. राज्य सरकारांनी अशा वादांना खतपाणी न घालता सर्वसमावेशक सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वाढीस लावला पाहिजे, अन्यथा संपूर्ण देशाला याचे गंभीर दुष्परिणाम भोगावे लागतील. आपल्या देशाची अखंडता टिकवण्यासाठी आधी राष्ट्र, नंतर राज्य हीच भूमिका प्रत्येक नागरिकाने आणि प्रशासनाने स्वीकारली पाहिजे. केंद्र सरकारने या वाढत्या प्रादेशिक फुटीरतावादी मानसिकतेची गंभीर दखल घेऊन राष्ट्र प्रथम या तत्त्वाच्या रक्षणासाठी तात्काळ ठोस पावले उचलायला हवीत.‘‘

## अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण ‘अ, ब, क, ड’ करा; मातंग समाजाचा ३१ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**जालना । प्रतिनिधी**

अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण ‘अ, ब, क, ड’ या पद्धतीने करण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी समस्त मातंग समाजाच्या वतीने ३१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. याबाबतची माहिती मातंग समाजाचे नेते अशोक साबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात होणार आहे. गांधी चमन येथून मोर्चा निघून शनी मंदिर, उड्डाणपूल, नूतन वसाहत मार्गे अंबड चौफुली येथे पोहोचणार असून, तेथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या जाहीर सभेसाठी मातंग समाजाचे प्रमुख नेते व पदाधिकारी, अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे, अमित बोडके, विष्णू कसबे, कुमार कांबळे, आदित्य चांदणे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले. या मोर्चाला मोठा प्रतिसाद मिळणार असून सुमारे १० ते १५ हजार समाजबांधव सहभागी होतील, असा दावा अशोक साबळे यांनी पत्रकार परिषदेत केला.

पत्रकार परिषदेला मातंग समाजाचे नेते कृष्णा पांडव, रविकांत जगधने, विष्णू गवळी, सचिन क्षीरसागर, संजय गायकवाड, किरण शिरसाट, सर्जेराव जाधव, अंकुश राजगिरे, चंद्रकांत कारके, ललित कुचेकर, विठ्ठल तुपसौदर, चतुसिंग गोफणे, संतोष तुपसौदर, मुक्ताराम सोनवणे, राम सुतार, रवी पांडव, संतोष निकाळजे, रवी पाखरे, अरविंद शिरगुळे, सुरेश कांबळे, किशोर कांबळे, कुंडलिक कसबे, रंजीत शेजुळ, कारभारी जाधव, सुरेश घोरपडे, राहुल कारके, गणेश लोढे आदी उपस्थित होते. प्रमुख मागणी अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण ‘अ, ब, क, ड’ पद्धतीने करून मातंग समाजाला न्याय्य प्रतिनिधित्व व आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

# नेपाळचा जलप्रलय भारतासाठी धोक्याची घंटा!

नेपाळमध्ये अतिवृष्टी, भूस्खलन, हिमनदी फुटणे आणि अचानक आलेल्या महापुरामुळे निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. नद्या दुथडी भरून वाहत असून अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. डोंगराळ प्रदेशातील रस्ते, पूल, घरे आणि इतर पायाभूत सुविधा पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे बाधित झाल्या आहेत. या नैसर्गिक आपत्तीने नेपाळसमोर मोठे संकट उभे केले असले, तरी भारतासाठीही हा गंभीर इशारा आहे.

हिमालय हा केवळ नेपाळचा किंवा भारताचा भूभाग नाही; तो संपूर्ण दक्षिण आशियाच्या पर्यावरणीय सुरक्षिततेचा आधार आहे. हिमालयातून उगम पावणाऱ्या अनेक नद्या भारत आणि नेपाळमधून वाहतात. त्यामुळे नेपाळमध्ये घडणाऱ्या हवामानविषयक घटनांचा परिणाम सीमावर्ती भारतीय भागांवर होण्याची शक्यता कायम असते. म्हणूनच नेपाळमधील जलप्रलयाकडे केवळ शेजारच्या देशातील आपत्ती म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. अतिवृष्टी, ढगफुटी, हिमनद्या वितळण्याचा वाढता वेग आणि हिमनदीतील तलाव फुटण्याच्या घटना या बदलत्या हवामानाचे गंभीर संकेत आहेत. हिमालयीन प्रदेशात तापमानवाढीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. अशा परिस्थितीत अचानक मोठ्या प्रमाणावर पाणी खाली येते आणि नदीकाठच्या वस्त्यांना त्याचा फटका बसतो. डोंगराळ भागातील अरुंद दऱ्या आणि नदीखोऱ्यांमध्ये हा धोका आणखी वाढतो. नेपाळमधील या आपत्तीत भारताने मदतीचा हात पुढे करणे ही केवळ शेजारधर्माची बाब नाही, तर मानवी कर्तव्याचीदेखील आहे. आपत्तीच्या काळात अन्न, औषधे, बचाव साहित्य, पाणी, तात्पुरता निवारा आणि अन्य आवश्यक सामग्री उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर भारत आणि नेपाळने हिमालयीन प्रदेशातील आपत्ती व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी संयुक्त यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे. विशेषतः नदीच्या पाण्याची पातळी, अतिवृष्टी, हिमनदीतील बदल आणि संभाव्य पूर याबाबत रिअल-टाइम माहितीची देवाणघेवाण झाली पाहिजे. सीमावर्ती भागातील नागरिकांना वेळेवर इशारा मिळाला, तर अनेक जीव वाचवता येऊ शकतात. केवळ आपत्ती घडल्यानंतर मदत करण्याऐवजी आपत्ती येण्यापूर्वीच सज्ज राहणे ही काळाची गरज आहे. या घटनेतून भारताने स्वतःसाठीही महत्त्वाचा धडा घेण्याची आवश्यकता आहे. हिमालयीन राज्यांमध्ये अनियंत्रित बांधकाम, नदीपात्रांवरील अतिक्रमण, डोंगर उतारांवरील बेसुमार विकास आणि पर्यावरणाचा विचार न करता उभारल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधा भविष्यात धोकादायक ठरू शकतात. विकास आवश्यक आहे; मात्र निसर्गाच्या क्षमतेचा विचार करून केलेला विकासच शाश्वत विकास ठरतो. हिमालय हा अत्यंत संवेदनशील प्रदेश आहे. येथे रस्ते, धरणे, पर्यटन प्रकल्प आणि वसाहती उभारताना पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. नदीला तिचा नैसर्गिक प्रवाह मिळणे, पूरक्षेत्रात अनावश्यक बांधकाम टाळणे, जंगलांचे संवर्धन करणे आणि डोंगर उतारांचे संरक्षण करणे याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. हवामान बदल ही आता भविष्यातील समस्या राहिलेली नाही. त्याचे परिणाम आजच जाणवत आहेत. त्यामुळे भारताने आपत्ती व्यवस्थापनाच्या पारंपरिक पद्धतींपलीकडे जाऊन पूर्वसूचना प्रणाली, उपग्रह निरीक्षण, हवामान अंदाज, नदी निरीक्षण आणि स्थानिक प्रशासनाचे प्रशिक्षण अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. नेपाळच्या आपत्तीने माणूस आणि निसर्ग यांच्यातील बिघडत चाललेला समतोल पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. संकटाच्या काळात भारताने नेपाळला सर्वतोपरी मदत करावीच; परंतु त्याचबरोबर या आपत्तीतून स्वतःच्या भविष्यासाठीही धडा घ्यावा. निसर्गाला आव्हान देऊन विकास साधता येत नाही. निसर्गाचा सन्मान करून, पर्यावरणाचे रक्षण करत आणि आपत्तीपूर्व तयारी मजबूत करत केलेला विकासच खऱ्या अर्थाने सुरक्षित विकास आहे. नेपाळच्या भीषण जलप्रलयाने भारताला दिलेला हा इशारा वेळीच समजून घेण्याची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## २७ वर्षे मेलेला म्हणून फिरणारा ताराचंद अखेर दुचाकीवर पकडला – व्यवस्था फक्त कागदावर जिवंत?

**जालना - प्रतिनिधी**

आग्रा येथील धक्कादायक प्रकार - कागदावर मेलेला ताराचंद प्रत्यक्षात रस्त्यावर दुचाकी चालवत होता

आग्रा - ताराचंद शर्मा नावाच्या आरोपीने केवळ एका कागदाच्या तुकड्यावर २७ वर्षे स्वतःला मेलेला दाखवले आणि न्यायालयानेही त्यावर विश्वास ठेवून त्याला मेलेला घोषित केले. कायद्याबरोबरच पूर्ण व्यवस्थाच आंधळी झाल्याचे या घटनेतून समोर आले आहे.

हे प्रकरण १९९९ सालचे आहे. मदन गोपाल वर्मा यांनी बनावट मृत्युपत्र तयार केल्याप्रकरणी आग्रा न्यायालयात फौजदारी खटला दाखल केला होता. या खटल्यात विद्या देवी, चुन्नी लाल गोयल, रोशन लाल वर्मा आणि तारा चंद शर्मा हे आरोपी होते. ताराचंद शर्मा हा बनावट मृत्युपत्राचा साक्षीदार होता. खटला सुरू असताना तीन आरोपींचा खरोखरच मृत्यू झाला. चौथा आरोपी तारा चंद शर्माने याचा फायदा घेतला. त्याच्या गांधी नगर भागातच त्याच नावाचा दुसरा व्यक्ती ०२.०९.१९९८ रोजी मरण पावला होता. आरोपी तारा चंदने त्या दुसऱ्या व्यक्तीचे १४.१२.१९९८ चे मृत्यू प्रमाणपत्र स्वतःचे म्हणून न्यायालयात सादर केले. १३.०८.२०१३ रोजी हरी पर्वत पोलिसांनीही तो मेलेला असल्याचा अहवाल दिला. त्यामुळे १८.०३.२०१७ रोजी सर्व आरोपी मरण पावले म्हणून खटलाच बंद करण्यात आला.

**तारा चंदच्या दुचाकीने केला भांडाफोड**

कायद्याच्या नजरेत मेलेला तारा चंद शर्मा प्रत्यक्षात जिवंत होता. त्याने २०१४ मध्ये नवीन दुचाकी खरेदी केली आणि जुलै २०१६ मध्ये स्वतःच्याच नावाने प्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंदणीही केली. एका कार्यालयात तो मेलेला, तर दुसऱ्या कार्यालयात जिवंत. फेब्रुवारी २०२५ मध्ये फिर्यादीचे पुत्र राज कुमार वर्मा यांनी त्याला दुचाकी चालवताना पाहिले, चित्रफीत काढली आणि परिवहन कार्यालयातून माहिती मिळवून भांडाफोड केला. अखेर तारा चंद शर्माने मुख्य न्यायदंडाधिकारी शिवानंद गुप्ता यांच्या न्यायालयात आत्मसमर्पण केले, मात्र न्यायालयाने जामीन नाकारत त्याला कारागृहात पाठवले.

आमची व्यवस्था जिवंत आहे की मेलेली? फक्त कागदावर चालते

या घटनेने एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे - आपली संपूर्ण यंत्रणा फक्त कागदावरच चालते का? एखादा माणूस जिवंत आहे की मेलेला, हे ठरवण्यासाठी व्यवस्थेकडे कागदाशिवाय दुसरे कोणतेही पडताळणी साधन नाही का?

**यावर ॲड. महेश धन्नावत यांचे परखड मत - ''हा केवळ फसवणुकीचा गुन्हा नाही, तर हा न्यायालयाची आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेची फसवणूक आहे. तारा चंद शर्माने खोटे मृत्यू प्रमाणपत्र सादर करून २७ वर्षे न्यायालयाला अंधारात ठेवले आहे. हा प्रकार भारतीय न्याय संहितेच्या कलम २२९, कलम ३३६(३) आणि ३३६(४), कलम ३४०(२) आणि कलम ३१८, ३१९ अंतर्गत अत्यंत गंभीर गुन्हा आहे.**

**अशा प्रकरणात न्यायालयाने कोणतीही सहानुभूती न दाखवता कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यात कोणीही मृत्यूचा बनाव करून कायद्यापासून पळ काढण्याचा विचारही करणार नाही.'' - ॲड. महेश धन्नावत**

## गणेशोत्सव डीजेमुक्त आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करा- हिंदु जनजागृती समितीचे आवाहन



सार्वजनिक गणेशोत्सवाचे पावित्र्य राखण्यासाठी हा उत्सव पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि डीजेमुक्त () साजरा करावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केले आहे. याविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना श्री. सुनील घनवट पुढे म्हणाले की, ''गणेशोत्सव हा मूळचा सात्विक, पवित्र आणि आनंददायी असा उत्सव आहे. परंतु, गेल्या काही वर्षांपासून या मंगलमय उत्सवाला गालबोट लागल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः डीजेच्या माध्यमातून लावली जाणारी अश्लील गाणी, त्यावर होणारी बीभत्स नृत्ये आणि कर्णकर्कश आवाज यांसारख्या विकृती उत्सवात शिरल्या आहेत. या सर्व प्रकारांमुळे गणेशभक्त आणि सामान्य नागरिकांच्या आरोग्याचा व शांततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लोकमान्य टिळकांनी समाज प्रबोधन, लोकजागृती आणि हिंदु संघटन या उदात्त हेतूंनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली होती. मात्र, सध्या पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणामुळे हा मूळ उद्देश कुठेतरी हरवत चालला असून उत्सवाचे स्वरूप विकृत होत आहे. हिंदु जनजागृती समितीने गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सवातील या डीजे संस्कृतीला आणि अन्य अनिष्ट प्रथांना सातत्याने कडाडून विरोध दर्शवला आहे. यावर्षीही अशा अपप्रवृत्तींना आळा बसावा, अशी आमची ठाम मागणी आहे. सद्यस्थितीत एक सकारात्मक बाब म्हणजे, अनेक गणेशोत्सव मंडळे डीजेमुक्त उत्सव साजरा करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे येत आहेत. सोलापूरसारख्या शहरात सोलापूर पॅटर्न राबवून एक चांगला आदर्श निर्माण करण्यात आला आहे. भाविकांना खऱ्या अर्थाने सात्विक आनंद मिळवून देण्यासाठी, लोकप्रबोधन करण्यासाठी तसेच हिंदु संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्यासाठी उत्सवामध्ये डीजेची अजिबात आवश्यकता नाही. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि आपल्या वैभवशाली संस्कृतीनुसार गणेशोत्सव साजरा केल्यास त्याला कोणाचाही विरोध असणार नाही.''

त्यामुळे सर्व गणेशोत्सव मंडळे, गणेशभक्त आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे पुढे यावे आणि आपला गणेशोत्सव पारंपरिक वाद्यांच्या साथीने, अत्यंत आनंदाने व परंपरेनुसार डीजेमुक्त साजरा करावा, असे आवाहन श्री. घनवट यांनी या वेळी केले.

## कवयित्री डॉ. सविता लोंढे यांच्या 'खर्ची पडलीत काही स्वप्न' कवितासंग्रहाचा सोमवारी प्रकाशन सोहळा

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

प्रसिद्ध कवयित्री डॉ. सविता लोंढे यांच्या 'खर्ची पडलीत काही स्वप्न' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.हा प्रकाशन सोहळा मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवछत्रपती महाविद्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध समीक्षक तसेच मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. दादा गोरे राहणार आहेत. प्रसिद्ध साहित्यिक, लेखक, ज्येष्ठ समीक्षक आणि आंबेडकरी विचारवंत डॉ. ऋषीकेश कांबळे यांच्या हस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमास शिवछत्रपती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच प्रसिद्ध कवी, समीक्षक व कादंबरीकार डॉ. सुदाम राठोड (नाशिक) आणि रमाई मासिकाच्या संपादक प्रा. डॉ. रेखा मेश्राम हे प्रमुख भाष्यकार म्हणून उपस्थित राहणार आहेत.,कवयित्री डॉ. सविता लोंढे यांच्या साहित्यिक प्रवासातील हा महत्त्वपूर्ण टप्पा असून, त्यांच्या 'खर्ची पडलीत काही स्वप्न' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमी, कवी, लेखक, वाचक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कवयित्री डॉ. सविता लोंढे, सुनील वाघमारे तसेच सहभागी संस्था शिवछत्रपती महाविद्यालय, प्रगतिशील लेखक संघ, शात्तब्दी काव्य मंडळ, आम्ही सिद्धहस्त लेखिका ग्रुप आणि ध्यास गझल समूह यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'धन-दौलत नव्हे,बुद्धाचा धम्मच सुख-समृद्धीचा खरा मार्ग!' – सुधाकर निकाळजे

### *पापळ येथे माता रमाईंच्या पूर्णाकृती पुतळ्याचे दिमाखात अनावरण*

**दत्ता देशमुख**

जगात धन-दौलत नव्हे, तर बुद्धाचा धम्मच तुम्हाला सुख,समृद्धी, शांती आणि समाधानाकडे नेऊ शकतो. त्यामुळे बौद्धांनी धम्मकार्यात स्वतःला झोकून दिले पाहिजे,'' असा घणाघाती संदेश जयभीम सेना संस्थापक अध्यक्ष भाई सुधाकर निकाळजे यांनी दिला.

श्रावस्ती पौर्णिमेच्या पावन दिनाचे औचित्य साधून जाफ्राबाद तालुक्यातील पापळ येथे माता रमाई यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे भव्य अनावरण बुद्ध भिक्षुणी आर्याजी यांच्या प्रमुख उपस्थितीत भाई सुधाकर निकाळजे यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यामुळे पापळ परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले.



रमाईंच्या त्यागाला पुतळ्याच्या रूपाने अभिवादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारी माता रमाईंचा पूर्णाकृती पुतळा असावा आणि त्यांच्या त्याग,संघर्ष,समर्पण व समाजाप्रती असलेली आत्मसमर्पित भावना नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उदात्त हेतूने हा उपक्रम साकारण्यात आला. धम्माचा प्रचार व प्रसार करताना प्रतिग्रहणातून प्राप्त झालेल्या धम्मदानरूपी रकमेतून बुद्ध भिक्षुणी आर्याजी यांनी आपल्या पूर्वाश्रमीच्या जन्मस्थळी आर्थिक सहकार्य करून पुतळा उभारणीमध्ये मोलाचा वाटा उचलला. त्यामुळे हा पुतळा केवळ स्मारक न राहता धम्म,त्याग आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणास्तंभ ठरला आहे. 'शील-सदाचार-करुणेच्या मार्गाने चला!' भाई सुधाकर निकाळजे यांनी आपल्या भाषणात शील,सदाचार आणि करुणेच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले. राजकीय,सामाजिक,आर्थिक आणि शैक्षणिक निर्णय घेताना सद्बुद्धीचा वापर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. देशातील सध्याची राजकीय व धार्मिक परिस्थिती पाहता बौद्ध समाजाने धम्मकार्यात अधिक सक्रिय होण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी बुद्धाच्या धम्माची जीवनाला दिशा देणारी शक्ती स्पष्ट केली. 'रमाई नसत्या तर बाबासाहेबांचे महान कार्य शक्य झाले नसते' पुतळ्याचे शिल्पकार महाराष्ट्रातील प्रसिद्ध मूर्तिकार दादाराव लहाने यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. रमाईंचा आदर्श प्रत्येक महिलेने घ्यावा अध्यक्षीय भाषणात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष उत्तमराव वानखेडे यांनी माता रमाईंच्या कणखरपणा,त्याग आणि दृढनिश्चयाचा गौरव केला. बाबासाहेबांच्या जीवनकार्याच्या उभारणीत रमाईंचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत आजच्या महिला व मुलींनी माता रमाईंच्या जीवनाचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उषाताई विकास बोर्डे यांनी श्रावस्ती पौर्णिमेचे महत्त्व विशद केले. सुख-समृद्धीचा उपयोग केवळ भौतिक उपभोगासाठी न करता सदाचरण,ज्ञान आणि पुण्यकर्मासाठी करावा, असा संदेश त्यांनी दिला. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दादाराव लहाने,भाई राजूभाऊ मगरे,पत्रकार विजय खरात,बाबुराव साळवे,श्रीकिसन गायकवाड,उषाताई विकास बोर्डे,समता सैनिक दलाचे कमांडर बबन खरात,धनंजय गायकवाड,किरण मगरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विकास बोर्डे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंबादास मोरे,संदीप मोरे,दीपक मोकळे,उद्धव भिसे,मिलिंद मोरे,विजय मोरे, सिद्धार्थ मोरे, रतन निकाळजे, नितेश मोरे, संदीप गवई,भीमराव मोरे,राहुल जाधव,विष्णू कांबळे,रमेश काकडे,विकास निकाळजे,अनिल भिसे,भारत मोरे,पंडित मोरे,ऋतिक मोरे,समाधान मोरे,गजानन भिसे तसेच पापळ येथील सर्व बौद्ध उपासक-उपासिका व महिला मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

## जाफराबाद – छत्रपती संभाजीनगर एसटीचा प्रश्न थेट मुंबईत; उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे-पाटील यांच्या तक्रारीची वरिष्ठ पातळीवर दखल

**भोकरदन - प्रतिनिधी**

जाफराबाद - छत्रपती संभाजीनगर - माहोरा- बरंजळा साबळेनळणी- जवखेडा- ठोंबरेकेदारखेडा- राजूर- तळेगाव - फुलंब्री या मार्गावरील बंद करण्यात आलेली एसटी बससेवा तात्काळ पूर्ववत सुरू करावी, तसेच प्रवाशांना बसमध्ये न घेण्याच्या तक्रारींची सखोल चौकशी करावी, या मागणीसाठी करण्यात आलेल्या पाठपुराव्याला आता मुंबईतील एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयातून दखल घेण्यात आली आहे. जाफराबाद आगारामार्फत ३ जुलै २०२६ रोजी सुरू करण्यात आलेली ही बससेवा परिसरातील अनेक गावांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली होती. विद्यार्थी, शेतकरी, महिला, कामगार, रुग्ण तसेच छत्रपती संभाजीनगर येथे विविध कामांसाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांना या सेवेचा मोठा फायदा होत होता.

मात्र, सेवा सुरू झाल्यानंतर काही ठिकाणी प्रवाशांना बसमध्ये न घेणे, बस थांब्यावर योग्य प्रतिसाद न देणे तसेच त्यानंतर प्रवासी संख्या कमी असल्याचे कारण देऊन सेवा बंद करण्याचे प्रकार होत असल्याची तक्रार करण्यात आली होती. या प्रकरणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भोकरदन उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे-पाटील यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक नितीन माइंड यांच्याकडे मेलद्वारे निवेदन सादर करून बससेवा तात्काळ पूर्ववत



करण्याची तसेच संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष

चौकशी करण्याची मागणी केली होती. निवेदनात राजूरसह चनेगाव,चिखली, दाभाडी, तळेगाव, टाकळी, लिधोरा आदी गावांतील प्रवाशांना बससेवेचा योग्य लाभ मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. तसेच, प्रवाशांना बसमध्ये

घेतले जात नसताना त्यानंतर प्रवासी संख्या कमी असल्याचे कारण देऊन बससेवा तोट्यात असल्याचे सांगणे योग्य आहे का, असा सवालही निवेदनातून उपस्थित

करण्यात आला होता. या संपूर्ण प्रकाराची वस्तुनिष्ठ तपासणी करून प्रवासी संख्या, बसच्या फेऱ्या, थांबे आणि प्रत्यक्ष प्रवासी सेवा यांचा स्वतंत्रपणे आढावा घेण्याची मागणी करण्यात आली होती.

मुंबईतील मध्यवर्ती कार्यालयाची दखल या निवेदनाची दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक (वाहतूक) नितीन माइंड यांच्या कार्यालयाकडून ते जालना विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. संबंधित पत्रात, 'मेलद्वारे प्राप्त झालेले निवेदन हे आपल्या विभागाशी संबंधित असल्याने पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी आपणाकडे पाठविण्यात येत आहे. तसेच केलेली कार्यवाही संबंधितांना कळवून या खात्यास कळविण्यात यावी,' असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता जालना विभागाचे विभाग नियंत्रक आणि जिल्हा वाहतूक अधिकारी या प्रकरणी नेमकी काय कार्यवाही करतात, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. बससेवा पूर्ववत करण्याची प्रमुख मागणी या प्रकरणात बंद करण्यात आलेली जाफराबादछत्रपती संभाजीनगरफुलंब्री

बससेवा तात्काळ पूर्ववत करावी, प्रवाशांना बसमध्ये न घेतल्याच्या तक्रारींची चौकशी करावी, उपलब्ध पुराव्यांची तपासणी करावी तसेच दोषी आढळणाऱ्या संबंधित चालक, वाहक किंवा अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नियमानुसार

कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. बससेवा पूर्ववत केल्यानंतर या मार्गावर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवून सर्व पात्र

प्रवाशांना बससेवेचा लाभ मिळेल, याची खात्री करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. आता जालना विभागाच्या कार्यवाहीकडे लक्ष

मुंबईतील मध्यवर्ती कार्यालयाकडून निवेदन जालना विभागाकडे पाठविण्यात आल्याने या प्रकरणाला आता प्रशासकीय पातळीवर महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे बससेवा पुन्हा सुरू होते का, तक्रारींची चौकशी होते का आणि

संबंधितांवर काय कारवाई केली जाते, याकडे जाफराबादसह राजूर, केदारखेडा, नळणी, बरंजळा साबळे, तळेगाव, फुलंब्री आणि परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाशी निगडित असलेली ही बससेवा केवळ नफा-तोट्याच्या निकषावर न पाहता, प्रवाशांना प्रत्यक्षात योग्य सेवा मिळते आहे का, याचा विचार करून ही सेवा तात्काळ पूर्ववत करण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# विखे पाटलांचा जात पडताळणी समित्यांबाबतचा सल्ला असंविधानिक व बेकायदेशीर : डॉ. संजय लाखेपाटील

## जात पडताळणी समित्या बरखास्त करण्याची भूमिका म्हणजे कायदेशीर प्रक्रियेलाच हरताळ; मराठा समाजाची वारंवार फसवणूक केल्याचा गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जात पडताळणी समित्यांच्या वैधानिक अस्तित्वाच्या मुद्द्यावरून मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी जोरदार टीका केली आहे. देशभर जात पडताळणी समित्या अस्तित्वात नसून केवळ महाराष्ट्रातच अशा समित्या असल्याने त्यांची आवश्यकता नाही आणि त्या बरखास्त कराव्यात, असा सल्ला विखे पाटील यांनी दिल्याचे समोर आल्याचा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला आहे. ही भूमिका धक्कादायक, असंविधानिक आणि बेकायदेशीर असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. जात प्रमाणपत्रांची पडताळणी, बनावट प्रमाणपत्रांना आळा घालणे आणि आरक्षणाचा लाभ पात्र व्यक्तींनाच मिळावा, यासाठी निर्माण करण्यात आलेल्या वैधानिक यंत्रणेच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी म्हटले आहे. विखे पाटील यांच्याकडून वैधानिक व कायदेशीर तरतुदींबाबत घोर अज्ञानातून अशा प्रकारचा सल्ला दिला जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

डॉ. लाखेपाटील यांनी स्पष्ट केले की, जात पडताळणी किंवा जात छाननी समित्यांची संकल्पना केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही. देशातील विविध राज्यांमध्ये जात आणि जमातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी वेगवेगळ्या स्वरूपाच्या प्रशासकीय व वैधानिक यंत्रणा कार्यरत आहेत, असा दावा त्यांनी केला.

जात प्रमाणपत्रांच्या पडताळणीची प्रक्रिया ही आरक्षण व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची बाब असून, पात्र लाभार्थ्यांना आरक्षणाचा लाभ मिळण्याबरोबरच खोटी किंवा बनावट प्रमाणपत्रे सादर करून आरक्षणाचा गैरफायदा घेणाऱ्यांना रोखणे हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे अशा यंत्रणेची गरजच नाही, असा युक्तिवाद करणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले. जात पडताळणी समित्यांच्या कायदेशीर आणि प्रशासकीय



व्यवस्थेचा संदर्भ देताना डॉ. लाखेपाटील यांनी कुमारी माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास या सर्वोच्च न्यायालयातील ऐतिहासिक प्रकरणाचा दाखला दिला. Civil Appeal No. ५८५४ १९९४ या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जात व जमातीच्या प्रमाणपत्रांची छाननी आणि पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र छाननी समित्यांची व्यवस्था करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले होते, असे त्यांनी नमूद केले.

या न्यायालयीन निर्देशांच्या पार्श्वभूमीवर जात प्रमाणपत्रांच्या छाननी-पडताळणीची प्रक्रिया आणि समित्यांची रचना करण्यात आली. त्यामुळे जात पडताळणी समित्यांना केवळ प्रशासकीय सोय म्हणून पाहता येणार नाही. बनावट प्रमाणपत्रांना आळा घालणे आणि आरक्षणाचा लाभ योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचविणे, हा या व्यवस्थेचा मूलभूत उद्देश असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले. जात पडताळणी समित्यांचा प्रश्न केवळ मराठा समाजापुरता मर्यादित नाही. राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच विविध सामाजिक घटकांच्या आरक्षणाच्या हक्काशी जात प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित आहे. त्यामुळे अशा समित्यांचे अस्तित्वच संपुष्टात आणण्याची भूमिका घेतल्यास त्याचा परिणाम विविध समाजघटकांवर होऊ शकतो, असा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला. खोट्या जात प्रमाणपत्रांच्या माध्यमातून आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांना रोखण्यासाठी प्रभावी पडताळणी यंत्रणा आवश्यक आहे. ही यंत्रणा कमकुवत झाली तर पात्र लाभार्थ्यांच्या हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जात पडताळणी व्यवस्थेबाबत कोणताही निर्णय घेताना घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि विद्यमान कायदेशीर व्यवस्था यांचा सखोल विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न संवेदनशील असताना जात पडताळणी समित्यांच्या अस्तित्वाबाबत अशा प्रकारची भूमिका मांडली जाणे गंभीर असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यात यापूर्वी मोठ्या प्रमाणावर आंदोलने झाली आहेत. अशा परिस्थितीत आरक्षणाशी संबंधित वैधानिक यंत्रणेबाबत संभ्रम निर्माण करणारी वक्तव्ये झाल्यास त्याचा परिणाम तरुणांमध्ये आणि विविध समाजघटकांमध्ये होऊ शकतो. त्यामुळे सामाजिक अस्वस्थता किंवा गैरसमज निर्माण होऊ नयेत, यासाठी सरकारमधील जबाबदार व्यक्तींनी अत्यंत सावधपणे भूमिका मांडणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

जात पडताळणी समित्यांचे अस्तित्व संपुष्टात आणण्याचा कोणताही प्रयत्न झाला तर त्याला कायदेशीर आव्हान निर्माण होऊ शकते, असा इशाराही डॉ. लाखेपाटील यांनी दिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार विकसित झालेली जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया आणि राज्यातील संबंधित कायदेशीर तरतुदी लक्षात घेता, समित्या बरखास्त करण्याचा निर्णय सहजपणे घेता येणार नाही. त्यासाठी घटनात्मक आणि न्यायालयीन चौकटीचा विचार करणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**'मराठा समाजाची वारंवार फसवणूक'**

राधाकृष्ण विखे पाटील हे मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष असल्याने त्यांच्या भूमिकेकडे मराठा समाजाचे विशेष लक्ष असते. अशा स्थितीत जात पडताळणी समित्यांबाबत त्यांनी केलेली कथित भूमिका मराठा समाजाच्या दृष्टीने संभ्रम *(पान २ वर)*

# महिला आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य; 'उमेद'मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना – भाजपा गजानन जोशी

## कृषी अवजार बँक, कृषी निविष्ठा केंद्रांसह महिलांच्या हाती शेतीची आधुनिक यंत्रे

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात ग्रामीण महिलांना केवळ बचत गटांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना शेती, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद'च्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला व्यापक स्वरूप मिळत असून, आधुनिक शेती तंत्रज्ञान, कृषी निविष्ठा आणि विविध व्यवसायांच्या माध्यमातून महिलांना शाश्वत उत्पन्नाची साधने उपलब्ध होत आहेत.

महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणाऱ्या या उपक्रमांबद्दल भाजपा प्रदेश सदस्य तथा महाजनशक्तीपरिषद संस्थापक अध्यक्ष ''गजानन जोशी उमरेकर'' यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. ग्रामीण भागातील गरजू महिलांनी 'उमेद'च्या विविध योजनांचा



लाभ घेऊन शेती, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

**''४०८ कृषी अवजार बँकांची उभारणी''**

'उमेद' अभियानांतर्गत कृषी अवजार बँक आणि कृषी निविष्ठा केंद्र हे महत्त्वाचे उपक्रम राबविले जात आहेत. महागडी कृषी यंत्रे स्वतः खरेदी करण्याऐवजी महिला शेतकऱ्यांना ती भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणे, हा कृषी अवजार बँकेचा प्रमुख उद्देश आहे. सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ३५१ तालुक्यांत ४०८ कृषी अवजार बँका स्थापन करण्यात आल्या असून, सुमारे ४० हजार ८०० महिला शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला आहे. या अवजार बँकांमध्ये विविध कृषी अवजारांसह ट्रॅक्टरची सुविधाही उपलब्ध आहे.

महिला स्वयंसहाय्यता समूह, ग्राम संघ, प्रभाग संघ तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून या अवजार बँकांचे व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे ही केंद्रे केवळ यंत्रसामग्री भाड्याने देणारी केंद्रे न राहता, समुदायाच्या मालकीची कृषी सेवा केंद्रे म्हणून विकसित होत आहेत.

**''शेतीचा खर्च कमी; उत्पादकतेला चालना''**

महागडी कृषी यंत्रसामग्री खरेदी करण्याची गरज नसल्याने *(पान २ वर)*

# सिद्धार्थ महाविद्यालयात वृक्ष रक्षाबंधन उत्साहात साजरे

**दत्ता देशमुख**

ऑगस्ट २०२६ : पर्यावरण संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करून वृक्षांप्रती जिव्हाळा व संरक्षणाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सविता सिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. एस. एल. मेढे, उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे व उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्षाबंधनाच्या निमित्ताने



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी महाविद्यालय परिसरातील विविध वृक्षांना राख्या बांधून 'वृक्षांचे रक्षण करा, पर्यावरणाचे संरक्षण करा' असा संदेश दिला. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनाही विद्यार्थिनींनी राख्या बांधून रक्षाबंधनाचा उत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. यावेळी वृक्षांचे संगोपन व संरक्षण करण्याचा संकल्प करण्यात आला.

या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेम, वृक्षसंवर्धन, सामाजिक बांधिलकी आणि निसर्गाप्रती कर्तव्यभावना निर्माण झाली. रक्षाबंधनाच्या सणाला सामाजिक व पर्यावरणीय संदेशाची जोड देणारा हा उपक्रम विशेष ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. एस. पी. जगतवाड, प्रा. डॉ. प्रदीप मिसाळ व सौ. प्रा. डॉ. सारिका जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी प्रतिनिधी वैभव रवींद्र देवरे, विद्यार्थी निरीक्षक आदित्य साळवे व शंकर देवडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, महाविद्यालयातील प्रा. अनिल वैद्य यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षांना राखी बांधून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संस्मरणीय ठरला.

# रक्षाबंधनातून बंधुभावासोबत पर्यावरण रक्षणाचा संदेश

**दत्ता देशमुख**

भारतीय संस्कृतीतील भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण जालना येथील हिंदू समाज संस्था संचलित दनकै.बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयात भारतीय परंपरेनुसार उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनींनी आपल्या विद्यार्थी बंधूंना तसेच शाळेतील शिक्षकांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या पवित्र बंधाची अनुभूती दिली. शिक्षकांना राखी बांधतानाचा प्रसंग सर्वांसाठी भावनिक ठरला. भारतीय संस्कृतीतील प्रेम,



आपुलकी, स्नेह आणि परस्पर रक्षणाची भावना या कार्यक्रमातून अधोरेखित झाली. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती मीनाक्षी कुलकर्णी यांनी स्वरचित भावगीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच श्रीमती अनघा जोशी यांनीही रक्षाबंधनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी भावगीत सादर केले. या भावपूर्ण सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने शिक्षकांनी विद्यार्थिनींना पारंपरिक भेटवस्तूंऐवजी वृक्ष भेट देत अनोखा पर्यावरणपूरक संदेश दिला. ''बहिणीच्या रक्षणासोबतच पर्यावरणाचे रक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे,'' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. वृक्ष संवर्धनाची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी, यासाठी त्यांना प्रेरित करण्यात आले.

भारतीय संस्कृतीतील सण-परंपरांचे *(पान २ वर)*

# सत्तेत असलेल्यांना प्रश्न विचारणारी निर्भीड पिढी घडतेय; देशभर परिवर्तनाचे आशादायी चित्र – दिपक डोके

**परतुर - प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील वाटूर येथे दिनांक २८ ऑगस्ट २०२६ रोजी पौर्णिमेचे औचित्य साधून भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचा समारोपीय कार्यक्रम वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक डोके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाला यावेळी बाळासाहेब आचळे भारतीय बौद्ध महासभा ठाणे जिल्हा संस्कार सचिव,बाळासाहेब अंभोरे माजी सभापती, पंचायत समिती परतुर, पळसखेड सरपंच राजु प्रधान, दिलीप मगर आदी सह मान्यवर प्रमुख उपस्थितीत होते यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन



करतांना श्री डोके यांनी सांगितले की,

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा आणि ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचे लढण्याचे बळ यामुळे प्रश्न विचारणारी, संविधानिक मूल्यांसाठी संघर्ष करणारी आणि अन्यायाविरोधात आवाज उठवणारी तरुणाई तयार होत आहे. *(पान २ वर)*

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने पद्माकर कवडे यांचा सत्कार

**परतूर - प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने संजय गांधी निराधार कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झालेले नवनिर्वाचित अध्यक्ष पद्माकरराव कवडे यांचा सत्कार शाल,हार,व श्रीफळ देऊन करण्यात आला.यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस,विठ्ठलराव बरकुले पाटील, रमेश पाईकराव सामाजिक न्याय विभाग प्रदेश सहसचिव, अहमद शेख ,कलीम भाई यांची उपस्थिती होती.



याप्रसंगी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस विठ्ठलराव बरकुले यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले, सर्वप्रथम लोकनेते आमदार बबनराव लोणीकर, राहुल भैया लोणीकर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष यांचे अभिनंदन केले कारण त्यांनी घेतलेला हा निर्णय परतूर तालुक्या पुरताच मर्यादित न राहता पूर्ण महाराष्ट्राच्या हिताचा राहील व सर्वसामान्यांच्या न्यायाला वाचा फोडण्यात येईल या दृष्टिकोनातून घेतलेला निर्णय म्हणजेच सामान्य कार्यकर्त्याला आपल्या पदाचा मान देऊन एक आदर्श निर्माण केलेला आहे. या मुळे सर्व *(पान २ वर)*

# पाटोदा शाळेत इको-फ्रेंडली रक्षाबंधन व क्रीडा दिवस





**मंठा - प्रतिनिधी**

आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत पाटोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवारी (२९ ऑगस्ट,२०२६ ) इको-फ्रेंडली राख्यांची निर्मिती करून रक्षाबंधन उत्साहात साजरे करण्यात आले. निसर्गातील विविध घटकांपासून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या विद्यार्थिनींनी बांधल्या. यावेळी अवांतर पुस्तकांचे वाचन तसेच राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. जागतिक स्तरावर भारताचा ठसा उमटविणाऱ्या खेळाडूंची व भारतीय विविध सणांची माहिति विद्यार्थ्यांना देण्यात आली.

मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, सहशिक्षक गंगाधर वानोळे, देविदास मामीलवार व गीता बरसाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी मराठी व इंग्रजी वाचन लेखन, वाचन डायरी, वर्ड ऑफ द डे, उत्कृष्ट वाचक, लोकसहभागातून डिजिटल शाळा निर्मिती, नव साक्षर भारत, स्पर्धा परीक्षांची तयारी असे अनेक उपक्रम शाळेमध्ये घेण्यात येत आहेत.

# रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी एका वर्षाची मुदत; मुंबई उच्च न्यायालयाकडून याचिका निकाली

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील सर्व रिक्षा, टॅक्सी आणि भाडेतत्त्वावरील वाहन चालकांसाठी मराठी भाषेच्या प्राथमिक ज्ञानाची सक्ती करण्याच्या नियमाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात महत्त्वाची भूमिका मांडली आहे. चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी आणि आत्मसात करण्यासाठी एका वर्षाचा कालावधी दिला जाईल, अशी ग्वाही राज्य सरकारने न्यायालयाला दिली.

कार्यवाहक मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या खंडपीठासमोर 'मोहम्मद कासिम अहमद विरुद्ध महाराष्ट्र शासन' या जनहित याचिकेवर सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान अतिरिक्त सरकारी वकिलांनी परिवहन विभागाकडून सूचना घेऊन स्पष्ट केले की, परिवहन मंत्र्यांनी चालकांना मराठी शिकण्यासाठी एका वर्षाची मुदत देण्याचा निर्णय निश्चित केला आहे. राज्य शासनाचे हे अधिकृत निवेदन नोंदवून घेत उच्च न्यायालयाने संबंधित जनहित याचिका निकाली काढली.

'राष्ट्र प्रथम' आणि सामाजिक सलोख्याची गरज: विधिज्ञ महेश धन्नावत यांचे परखड मत

या संपूर्ण घडामोडीवर कायदेतज्ज्ञ ॲड. महेश महेश धन्नावत यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना देशाच्या अखंडतेकडे लक्ष वेधले:

''देशातील प्रादेशिक अस्मिता आणि भाषांचा आदर असणे स्वाभाविक असले, तरी सर्व नागरिकांसाठी राष्ट्र प्रथम हीच भावना सर्वोच्च असायला हवी. आज विविध राज्यांमध्ये प्रादेशिकतेचा अतिरेक होताना दिसत आहे. तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्र्यांनी राज्यगीताला प्राधान्य देण्याची घोषणा केली असून मद्रास उच्च न्यायालयाने राष्ट्रगीतापूर्वी राज्यगीत वाजवण्यास हरकत नसल्याचे स्पष्ट केले. अशा प्रकारच्या निर्णयांमुळे राज्य प्रथम आणि राष्ट्र दुय्यम असा धोकादायक पायंडा पडत चालला आहे. शासनाने सर्वसामान्य जनतेला भाषा किंवा प्रादेशिक वादांच्या अनावश्यक कायदेशीर कचाट्यात आणि न्यायालयीन प्रकरणांत *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.